# जनसंपर्क अधिकारी कार्यालय, पालघर

**P.R.O. Office,Palghar**

phone no 02525-297032,Mo No 8669604078
Address-sp office Bidco Road,Palghar west
E-Mail- propalghar@gmail.com

## प्रेसनोट क्र.५७८ दिनांक १०/०७/२०२०

## विरार पोलीस ठाणे यांचेकडुन तंबाखुजन्य पदार्थ वाहतुक करणा-या आरोपीतांवर कारवाई करुन एकुण १६,२२,५२०/- रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त

दिनांक ०९/०७/२०२० रोजी १८.१५ वाजता विरार पोलीस ठाणे हद्दीतील अहमदाबाद- मुबंई हायवेवरुन गुजरात बाजुकडुन मुंबई बाजुकडे, खानिवडे टोलनाक्याचे ५०० मिटर अलीकडे आरोपीत १) मुशीर वसीम अन्सारी, वय- ३८ वर्षे, रा.गोवंडी, मुंबई २)नफीस अयुब सिद्दीकी, वय- ४१ वर्षे, रा.गोवंडी, मुंबई यांनी अहमदाबाद- मुबंई हायवेवरुन गुजरात बाजुकडुन मुंबई बाजुकडे जात असताना खानिवडे टोलनाक्याचे ५०० मिटर अलीकडे त्यांचे ताब्यातील टोयोटा इनोव्हा कारमध्ये तंबाखुजन्य गुटखा पासुन लोकांच्या जिवीतास अपाय घडण्याची संभावना असून महाराष्ट्र राज्यात प्रतिबंधीत आहे हे माहीत असतांना महाराष्ट्र राज्य शासनाचे आदेशाची आवज्ञा करुन वाहतुक करुन घेवुन जात असतांना मिळून आला. आरोपीत यांचे ताब्यातुन १)१५,००,०००/- रु. कि.ची एक टोयोटा इनोव्हा कार क्रमांक एम एच ०३ डी ए ८०३२ अशा ग्रे रंगाची जु.वा.कि.सु. २)५८,३२०/- रुपये किमतीचा निळया रंगाचा रजनीगंधा पानमसाला असे एकुण ६० बॉक्स, ३)१३,२००/-रुपये किमतीची जगत तबांखुचे १० बॉक्स ४)५१,०००/- रुपये किंमतीची चैनीखैनी तबांखुची २०० पाकीटे असा एकुण १६,२२,५२०/- रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असुन आरोपीत यांचे विरुध्द विरार पोलीस ठाणे गु.र.नं. I ६४२/२०२० भा.दं.वि.सं.कलम ३२८, २७२, २७३, १८८ सह अन्न सुरक्षा व मानदे कायदा २००६, मधील कलम २६ (२), ४, ३० (२), (ए) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्हयातील आरोपीत यांना दिनांक ०९/०७/२०२० राजी अटक करण्यात आली आहे.

सदरची कारवाई वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. सुरेश वराडे, विरार पोलीस ठाणे यांचे मार्गदर्शनाखाली विरार पोलीस ठाणेचे अधिकारी व कर्मचारी यांनी केली आहे.